**त्वरित/महत्वाचे**

अति. महापालिका आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र.अतिमआ(ज)/साप्रवि/आस्था-४/ 2992
दिनांक : 30/04/2018.

## कार्यालयीन परिपत्रक

विषय :कुटूंब कल्याण कार्यक्रमाअंतर्गत महापालिका सेवकांना एक अपत्यावर कुटूंब नियोजन केल्या प्रित्यर्थ दोन जादा वेतनवाढी मंजूर केलेल्या सेवकांची माहिती पाठविणेबाबत.

राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रम अंतर्गत ज्या शासकीय व निमशासकीय कर्मचा-यांनी एका अपत्यावर संतती नियमन केले आहे त्यांना प्रोत्साहन देण्यासाठीचे महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण प्राधिकृत प्रकाशन दि.१८ डिसेंबर १९९८ नुसार, पुणे महानगरपालिकेतील ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी दि.१८/१२/१९९८ नंतर कुटुंब कल्याण कार्यक्रमाखाली एका अपत्यावर संतती नियमन केले आहे, अशा महानगरपालिका अधिकारी/कर्मचाऱ्यांना संतती नियमन केल्याचे प्रमाणपत्राचे दिनांकापासून दोन जादा वेतनवाढी मा. महापालिका सभा ठराव क्र.५९० दि.२८/०२/२०११ अन्वये मंजुरीने आणि अति. महापालिका आयुक्त (वि) कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.अतिमआ/उआ(ज)\से\१५८४ दि.२१/०७/२०११ मधील आदेशांप्रमाणे देण्यात येत होत्या.

सध्यस्थितीत उपरोक्त प्रमाणे वेतनवाढी देण्याचे स्थगित केलेले असून, त्यावर पुढील निर्णय घेण्याची कार्यवाही चालू आहे, सदर निर्णय घेणेकामी ज्या महानगरपालिका अधिकारी/कर्मचाऱ्यांना दोन जादा वेतनवाढी मंजूर करून वेतनात देण्यात येत आहेत, अशा अधिकारी/सेवकांचे खालील माहितीची दाखल्यासह तातडीने आवश्यकता आहे.

| अ. क्र. | अधिकारी/सेवकाचे नाव | हुद्दा | वेतनवाढी मंजूर केल्याचा दिनांक | वेतनवाढी पूर्वलक्षी प्रभावाने मंजूर केल्या असल्यास दिलेली फरकाची एकूण रक्कम – वे क्र. दिनांक | अधिकारी/सेवक सेवेत कार्यरत आहेत/सेवा निवृत्त आहेत. |
|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | |
| २. | | | | | |

दाखला – प्रमाणित करण्यात येते कि या कार्यालयाकडील सेवाभिलेख, सेवापुस्तके यांची संपूर्णपणे तपासणी केली असता ज्या अधिकारी/सेवक यांना संतती नियमन केल्याचे कारणास्तव दोन जादा वेतनवाढी दिलेल्या आहेत अशा अधिकारी/सेवक यांची संख्या एकूण --------- आहे. या कार्यालाकडून कोणत्याही अधिकारी/सेवक यांना वरील माहितीमधून वगळलेले नाही.

विभागाचे वेतन पत्रकावर स्वाक्षरी करणारे अधिकारी यांची- स्वाक्षरी-

नाव-

हुद्दा-

कार्यालयाचे नाव-

एखादे खात्याची माहिती निरंक असली तरीही वरील विहित नमुन्यात कळविणे आवश्यक आहे. संबंधित खात्यांचे वेतन आहरण व संवितरण अधिकारी यांनी वरील विहित नमुन्यात माहिती संपूर्णपणे भरून दाखल्यानुसार प्रमाणित करून establishment@punecorporation.org या ई-मेलवर वरील माहितीचे पत्राची प्रत PDF स्वरूपात त्वरित पाठवावी. तसेच माहितीचे मूळ पत्र **प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग यांचेकडे दोन दिवसात टपालाने सादर करावयाचे आहे.**

तरी, सर्व खात्यांचे वेतन आहरण व संवितरण अधिकारी यांनी वरीलप्रमाणे मुदतीत पूर्तता करावी, प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग यांनी झालेल्या कार्यवाहीचा अहवाल अति. महापालिका आयुक्त (ज) कार्यालयास सादर करावा.

28.05.18

(शीतल तेली-उगले)
अति. महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका